


टीजी - फेम मालिका
(उद्दिष्ट गट वित्तीय जाणीव संदेश)

# आर्थिक साक्षरता



## शेतकऱ्यांसाठी

वित्तीय समावेशन व विकास विभाग, आरबीआय

**संदेश १**

किसान क्रेडिट कार्ड योजना - मूलतः पीक कर्ज गरजांसाठी व अंशतः चरितार्थासाठी

**संदेश २**

पीक कर्जांची त्वरित परतफेड करण्याचे अनेक फायदे आहेत.

**संदेश ३**

अडचणीत सापडल्याने शेतमालाची नाईलाजाने विक्री करणे टाळा - गोदाम पावत्यांच्यापोटी (वेअर हाऊस) वित्त मिळवा.

**संदेश 4**

पीक विमा - प्रधानमंत्री फसल विमा योजना (पीएमएफबीवाय)

**संदेश 5**

नैसर्गिक आपत्तींमुळे पीक नष्ट झाले तरीही निराश होऊ नका.  पीक किती नष्ट झाले त्याचे प्रमाण तुमच्या बँकेला कळवा आणि बँकांकडून मदत मिळवा.



किसान क्रेडिट कार्ड योजना - मूलतः पीक कर्जासाठी व अंशतः चरितार्थासाठी

अडचणीत सापडल्यामुळे शेतमालाची विक्री करणे टाळा - गोदाम पावत्यांच्या पोटी (जमा करून) कापणी नंतरच्या (पोस्ट हार्वेस्ट) वित्त सहाय्याचा लाभ घ्या#

पीक कर्जाची त्वरित परतफेड करण्याचे अनेक फायदे आहेत - व्याज अर्थसहाय्य योजना*



नैसर्गिक आपत्ती दरम्यान पीक गमावले असले तरीही निराश होऊ नका. पिकाची किती हानी झाली आहे हे तुमच्या बँकेला कळवा आणि पुनर्रचनेच्या स्वरुपात बँकांकडून सहाय्य मिळवा.

तुमच्या पिकाचा विमा उतरवून स्वतःचे संरक्षण करा. - प्रधान मंत्री फसल बीमा योजने (पीएमएफबीवाय) द्वारा पीक विमा

# भारत सरकारने वेळोवेळी घोषित केल्यानुसार,
*केवळ छोट्या व सीमान्त शेतकऱ्यांसाठी

## संदेश 1 - किसान क्रेडिट कार्ड योजना - मूलतः पीक कर्ज गरजांसाठी व अंशतः चरितार्थासाठी

केसीसी योजनेचा उद्देश, शेतकऱ्यांचा आकस्मिक खर्च भागविणे आणि पूरक कार्यकृतींशी संबंधित खर्च भागविणे ह्यासह, त्यांच्या उत्पादनाबाबतचे (मशागत) खर्च भागविण्यासाठी, सुलभरित्या, वेळेवर व पुरेसे कर्ज उपलब्ध करुन देणे.

1



पिकांची मशागत करण्यासाठीच्या लघु मुदतीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी

2



कापणी नंतरचे खर्च

3



शेतमालाचे विपणन करण्यासाठीचे कर्ज

4



शेती संबंधीच्या मालमत्तांचे अनुरक्षण करण्यासाठी व दुभती जनावरे, जमीनीवरील मत्स्यपालन इत्यादींसारख्या शेती संबंधित कार्यकृतींसाठी कार्यकारी भांडवल

5

शेतकऱ्याच्या चरितार्थाबाबतच्या आवश्यकता

6




पंप सेट, स्प्रेयर्स, दुभती जनावरे ह्यासारख्या संबंधित कार्यकृती आणि शेती ह्यासाठी गुंतवणूक करण्याबाबतच्या कर्ज गरजा




टीप

वरील घटक 1 ते 5 ह्यांची बेरीज, लघु मुदतीच्या कर्ज मर्यादेचा एक भाग असेल आणि 6 खालील घटकांची बेरीज ही दीर्घ मुदतीच्या कर्जाचा भाग असेल.

केसीसी खालील लघु मुदतीच्या कर्ज मर्यादेचे 10% घरखर्चासाठी/चरितार्थासाठी वापरता येत असले तरीही, अशा घरखर्चासाठी जास्त निधी वापरु/वळवू नका.




## असे का?

केसीसीचा उद्देश, तुमच्या पीक कर्जाबाबतच्या गरजा पूर्ण करणे हा आहे आणि केसीसी निधीमधून घरगुती खर्चासाठी मोठ्या रकमा खर्च केल्यास, तुमच्या उत्पन्न निर्माण करण्याच्या क्षमतेवर त्याचा विपरीत परिणाम होतो. तुमच्या शेतीविषयक कार्यकृतींमधून मिळणारे उत्पन्न, केसीसीखाली तुम्ही घेतलेले थकित कर्ज फेडण्यास मदत करते आणि पिकांशी संबंधित कार्यकृतींसाठी असलेला निधी अन्यत्र वळविला तर, कदाचित तुम्ही ते कर्ज फेडू शकणार नाही.



## केसीसीचे गुणविशेष

1 केसीसी कर्जदारांना एक एटीएम कम डेबिट कार्ड दिले जाईल. त्याचा उपयोग करुन, केसीसी खात्यामधून पैसे काढून, पीओएस टर्मिनल्समधून प्रदाने करता येतील.

2 केसीसीचे स्वरुप एका फिरत्या खात्यासारखे असेल. त्या खात्यातील शिल्लक रकमेवर बचत बँक दराने व्याजही मिळेल.

**रु. 1 लाख पर्यंतच्या कर्ज मर्यादेसाठी कोणतीही सांपार्श्विक प्रतिभूती/ तारण ठेवण्याची आवश्यकता नाही.**

## संदेश 2 :- पीक कर्जाची त्वरित परतफेड करण्याचे अनेक फायदे आहेत.

**बँकेकडून कर्ज घेणे**




वर्ष 2017-18 साठी, रु. 3 लाखापर्यंतच्या लघु मुदतीच्या पीक कर्जांसाठी 4% व्याजदर (भारत सरकारने वेळोवेळी घोषित केलेल्या व्याज अर्थसहाय्य योजना)*

**अपंजीकृत संस्था/सावकार ह्यांचेकडून कर्ज घेणे**



उच्च व्याजदर, तारण ठेवणे आवश्यक असेल किंवा नसेल

**कर्ज व व्याज वेळचेवेळी प्रदान करण्याचा फायदा**




- क्रेडिट स्कोअर मध्ये सुधारणा होते
- पुढील वेळी अधिक कर्ज रकमेचे कर्ज मिळवणे
- व्याजाचा खर्च कमी होतो.

* 4% व्याजदरासाठी पात्र असण्यासाठी, शेतकऱ्याने, बँकेने ठरविलेल्या तारखेच्या आत कर्जफेड केलेली असावी व कोणत्याही परिस्थितीत त्यासाठी एक वर्षापेक्षा अधिक काळ असू नये.

## संदेश 3 :- अडचणीत आल्यामुळे शेतमालाची नाईलाजाने विक्री करणे टाळा - गोदाम पावत्यांपोटी वित्तसहाय्याचा उपयोग करा.

पिके कितीही चांगली आली असली तरी अर्धेच काम झाले आहे. तुमचा शेतमाल चांगल्या भावाने विकला गेला पाहिजे




**गोदामांचा (वेअर हाऊसेस) उपयोग करा**



तुम्हाला रास्त भाव मिळत नाही असे वाटत असल्यास, तुमचा शेतमाल गोदामांमध्ये साठवून ठेवून त्याची पावती घ्या#. आणि ह्या पावत्यांपोटी, तुमच्या तातडीच्या रोकड गरजांसाठी बँकांकडून अर्थसहाय्य मिळवा. किसान क्रेडिट कार्ड असलेल्या छोट्या व सीमान्त शेतकऱ्यांना त्यांनी त्यांचा माल कापणी नंतर गोदामांमध्ये ठेवण्यासाठी देण्यात आलेल्या संक्राम्य (निगोशिएबल) पावत्यांपोटी, आणखी सहा महिन्यांसाठी, 7%* दराने व्याज अर्थसहाय्य उपलब्ध असेल.

* वेळोवेळी घोषित करण्यात येणारी भारत सरकारची अगदी अलिकडील अर्थसहाय्य योजना
#डब्ल्युडीआरए (वेअर हाऊसिंग डेवलपमेंट अँड रेग्युलेटरी ऑथोरिटी) प्रस्तुत वेअरहाऊसेसने दिलेली पावती.

## संदेश 4 :- पीक विमा :- प्रधान मंत्री फसल बीमा योजना (पीएमएफबीवाय)

### सर्वसमावेशक विमा संरक्षण

पिके बुडाल्यास, पीएमएफबीवाय एक सर्वसमावेशक संरक्षण/छत्र देऊ करते व त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर राहण्यास मदत होते व त्याशिवाय नवनवीन कार्यकृती करण्यास त्यांना प्रोत्साहन मिळते.

### कमी दराचे हप्ते

पीएमएफबीवाय ही शेतकऱ्यांना अत्यंत कमी दराच्या हप्त्यांमध्ये उपलब्ध आहे. रब्बी पिकांसाठी, विमा रकमेच्या कमाल 1.5%, आणि खरीप, अन्नपिके (फूड क्रॉप्स), द्विदल धान्ये, तेलबिया ह्यासाठी, विमा रकमेच्या 2% पर्यंत, आणि वार्षिक बागाईत/व्यापारी पिके ह्यासाठी, विमा रकमेच्या 5% पर्यंत. ही योजना, पीक चक्रातीलसर्व टप्प्यांसाठी, व काही विशिष्ट बाबतीत कापणी नंतरच्या जोखमींसाठीही विमा छत्र उपलब्ध करुन देते.

### हप्त्यामधील फरक

हप्त्याची रक्कम व शेतकऱ्यांनी द्यावयाचा विमा आकाराचा दर ह्यातील फरक केंद्र सरकार व राज्य सरकाराकडून समानतेने उचलला जाईल.



### कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांसाठी सक्तीचे

अधिसूचित केलेल्या पिकांसाठी, पीक कर्ज/केसीसी घेणा-या कर्जदार शेत-कऱ्यासाठी ही योजना सक्तीची आहे. तथापि, विमा उतरविलेल्या पिकांमध्ये विमा घेता येण्यासारखे हितसंबंध अस-लेल्या इतरांसाठी/कर्जदार नसलेल्या शेतकऱ्यांसाठी, ही योजना ऐच्छिक आहे.

### निरनिराळ्या नैसर्गिक आपत्तींपासून होणाऱ्या पीक हानीसाठी संरक्षण

नैसर्गिक आग व वीज पडणे, (2) वादळ, गारपीट, चक्रीवादळ, टायफून, टोर्नाडो इत्यादी. (3) पूर, जलमय होणे व भूस्खलन, (4) दुष्काळ/अवर्षण, शुष्कता (5) विनाशकारी कीटक/रोग इत्यादी, कापणी नंतरची हानी, आणि अधिसूचित केलेल्या क्षेत्रामधील एकाकी असलेल्या शेतांना हानी पोहोचविणाऱ्या, माहित असलेल्या स्थानिक धोक्यांमुळे म्हणजे, गारपीट, भूस्खलन, कोरडेपणा इत्यादीमुळे होणारे पिकांचे नुकसान/हानी ह्या संरक्षणाखाली/छत्राखाली येतात.

### नुकसान भरपाईचे 3 स्तर

पीक-जोखीम असल्यानुसार नुकसान भरपाईचे 70%, 80% व 90% असे तीन स्तर, सर्व पिकांसाठी उपलब्ध असतील.



**तोट्याबाबत हमी (इंडेमनिटी) = कायदेशीर जबाबदारी, हानी किंवा वित्तीय भार ह्यांच्यापासूनचे संरक्षण**

## संदेश 5 :- वैयक्तिक आपत्तींमुळे पीक हातचे गेले तरी निराश होऊ नका - पिकाच्या हानीचे प्रमाण बँकेला कळवा आणि बँकांकडून सहाय्य घ्या



केंद्र/राज्य सरकारने तुमचे क्षेत्र चक्रीवादळ, दुष्काळ, धरणीकंप, आग, पूर, त्सुनामी, गारपीट, भूस्खलन, हिमप्रपात, ढगफुटी, कीटकांचे आक्रमण, शीत लहर/धुके, इत्यादींसारख्या नैसर्गिक आपत्तींनी बाधित झाले आहे असे घोषित केले असल्यास, आणि पिकांची हानी 33% किंवा त्यापेक्षा अधिक झाली असल्यास, त्या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या हानीमुळे तुमची परतफेड करण्याची क्षमता बाधित झाली असल्याकारणाने, तुम्हाला कर्ज देणाऱ्या बँक शाखेकडे जावे.

## बँक तुमच्यासाठी काय करु शकते?




**लघु मुदतीची कर्जे (पीक कर्जे)**

झालेली हानी 33% ते 50% च्या दरम्यान असल्यास, परतफेड करण्याची कमाल मुदत 2 वर्षापर्यंत (1 वर्षाच्या मोराटोरियम कालावधीसह) देण्यास परवानगी आहे; आणि झालेली हानी 50% किंवा त्यापेक्षा अधिक असल्यास, परतफेडीचा पुनर्रचित कालावधी कमाल 5 वर्षांपर्यंत (एक वर्षाच्या मोराटोरियम कालावधी सह) वाढविला जाऊ शकतो.

तुमच्या लघु मुदत कर्जावरील मुद्दल व व्याज ह्यांचे एका मुदत कर्जामध्ये रुपांतरण करा.

पुनर्रचनेच्या सर्व प्रकरणांमध्ये, किमान एक वर्षाचा मोराटोरियम कालावधी विचारात घेतला जाईल. ह्याशिवाय, अशा पुनर्रचित कर्जांसाठी बँका अतिरिक्त तारण - प्रतिभूतीची मागणी करणार नाहीत.

**शेतकी कर्जे** - दीर्घ मुदत (गुंतवणूक) कर्ज :- तुमची परतफेड करण्याची क्षमता व नैसर्गिक आपत्तीची तीव्रता/प्रमाण हे विचारात घेऊन, विद्यमान मुदत कर्जाच्या हप्त्यांची पुनर्रचना केली जाईल.

**नैसर्गिक आपत्तींमुळे जेव्हा पिके तुमच्या हातातून जातात, तेव्हा तुमच्या बँक शाखेला त्याबाबत कळविणे व बँकेकडून सहाय्य घेणे तुमचे कर्तव्य ठरते.**

## उद्दिष्ट विशिष्ट वित्तीय साक्षरता साहित्य

श्री दीपक मोहंती, कार्यकारी संचालक, भारतीय रिझर्व बँक, ह्यांच्या अध्यक्षतेखालील, वित्तीय समावेशनावरील मध्यम-काल मार्गावरील समितीने केलेली एक शिफारस पुढील प्रमाणे होती. “सर्वांसाठी योग्य असलेले मत असा दृष्टीकोन, वित्तीय समायोजनासाठी ठेवणे कदाचित आदर्श ठरु शकणार नाही. कारण, निरनिराळ्या उद्दिष्ट गटांसाठी, वित्तीय शिक्षणाचे प्रकार वेगवेगळे आहेत. ह्यामुळेच वित्तीय शिक्षण साहित्य, निरनिराळ्या उद्दिष्ट गटांसाठी नेमकेपणाने घेतले गेले पाहिजे.”

आरबीआयच्या वित्तीय समावेशन व विकास विभाग (विसविवि)ने पाच निरनिराळ्या उद्दिष्ट गटांसाठी, म्हणजे, शेतकरी, छोटे उद्योजक, शाळेतील मुले, एसएचजी आणि ज्येष्ठ नागरिक - यांच्यासाठी नेमके साहित्य तयार केले आहे. वित्तीय साक्षरतेसाठी खास मजकूर असलेल्या पाच पुस्तकांच्या मालिकेमधील हे एक पुस्तक आहे.

**अस्वीकृती**

वाचकाला वित्तीयदृष्ट्या साक्षर करावयाच्या प्रामाणिक हेतूने, हे पुस्तक, वाचन व शैक्षणिक साहित्य म्हणून सादर करण्यात आले आहे. एखाद्या विशिष्ट वित्तीय उत्पादन/आणि/किंवा सेवा संबंधाने निर्णय घेण्यासाठी वाचकाला प्रवृत्त करण्यासाठी नाही.

**स्वामित्वहक्क**

प्रथम आवृत्ती : एप्रिल, 2018

मूळ स्त्रोताचा उल्लेख केला गेला असल्यास ह्याचे पुनर्निर्माण करण्यास परवानगी आहे.

**लेखन व प्रसिध्दी**

वित्तीय समावेशन व विकास विभाग

**भारतीय रिझर्व बँक**

10 वा मजला, केंद्रीय कार्यालय बिल्डिंग,

शहिद भगत सिंग मार्ग, फोर्ट, मुंबई

**आभार**

डिझाईन : कौशिक रामचंद्रन्

**वित्तीय समावेशन व विकास विभाग**
**भारतीय रिझर्व बँक**
10 वा मजला, केंद्रीय कार्यालय बिल्डिंग,
मुंबई, 400001, भारत